मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ४ अन्वये, ग्राम पंचायत विभाजनाचे/एकत्रिकरणाचे त्रिशंकू भागासाठी स्वतंत्र ग्राम पंचायत स्थापन करण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना.

महाराष्ट्र शासन.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम–११९८/प्र.क्र. ६२३/२२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. ९ मार्च १९९८

वाचा:– शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम–११८९/के.नं. ३०१०/२२ दि. ५–२–९०

शासन परिपत्रक:–

मुंबई ग्राम पंचायती व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या [सुधारणा] अधिनियम १९९४ या महाराष्ट्र अधिनियम क्र. २१/९४ दि. २२.४.९४ अन्वये मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ४ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार यापूर्वी विभागीय आयुक्त यांना असलेले ग्राम पंचायतीचे " गांव " म्हणून जाहिर करावयाचे अधिकार शासनाकडे आले. याबाबतचे प्रस्ताव विभागीय आयुक्त यांच्याकडून शिफारशीसह शासनास मोठ्या प्रमाणावर प्राप्त होत असतात. तथापि, अनेकवेळा असे प्राप्त झालेले प्रस्ताव, शासनाने याबाबतीत संदर्भाधिन दि. ५–२–९० च्या परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व निकषांची पूर्तता करणारे नसतात. तसेच, अनेकवेळा प्रस्ताव अपूर्ण असतात. महसूली गांव जाहीर झालेले नसणे, स्थायी समिती, ग्राम पंचायतीचा ठराव नसणे, निवडणूका होऊन दोन वर्षांचा कालखंड पूर्ण झालेला नसणे, लोकसंख्येची अट पूर्ण नसणे, तसेच इतर अनेक त्रुटी असलेल्या ग्राम पंचायतीचे गाव जाहीर करण्याचे प्रस्ताव शासनास प्राप्त होत असतात. तसेच प्रस्तावातील माहिती जूनी असते. प्रस्तावाची बांधणीसुध्दा सैल असते. संबंधित कागदपत्रे जोडलेली नसतात. तसेच प्रस्तावातील कागदपत्रे कोणत्या पृष्ठांवर आहेत याचेही आकलन होत नाही; शासन स्तरावर मोठ्या प्रमाणावर प्राप्त होणाऱ्या ग्रामपंचायत प्रस्तावाची छाननी करणे जिकरीचा व वेळेचा अपव्यय करणारे असते. यास्तव, शासन सव विभागीय आयुक्त यांना प्रस्ताव शासनास पाठवितांना पुढील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत या परिपत्रकान्वये सूचना देत आहे.

१] प्रस्ताव एकत्रिकरणाचा/विभाजनाचा/त्रिशंकू क्षेत्राच्या ठिकाणी स्वतंत्र ग्राम पंचायत स्थापन करणेचा आहे. याचा स्पष्ट उल्लेख प्रस्तावात असावा. तसेच सद्याच्या अस्तित्वात असलेल्या ग्राम पंचायतीची नांवे व प्रस्तावीत ग्राम पंचायतीची नांवे तालुका व जिल्ह्याचे नांव मराठी व इंग्रजीत सुवाच्य अक्षरात नांव टंकलिखीत असणे आवश्यक आहे.

२] प्रस्ताव सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे व दि. ५–२–९० च्या परिपत्रकातील सर्व अटी व निकष पूर्ण करणारा, विहीत नमुन्यात असावा व प्रपत्रावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांची अभिप्रायासहीत सही असावी.

३] ग्रामपंचायत विभाजनाचे/एकत्रिकरणाचे त्रिशंकू ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचे प्रस्ताव, ग्रामस्थांच्या/ग्रामपंचायतीच्या मागणीनुसारच शासन सादर करावेत. कारण अनेकवेळा, या संदर्भात न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवतात. प्रस्तावात संभाव्य ग्राम पंचायतीचे क्षेत्र निश्चीत असणे आवश्यक आहे. यास्तव, प्रस्तावित ग्रामपंचायतीच्या हद्दी/सीमारेषा दर्शविणारे गट क्र. / सर्वे क्र. असणारे प्रमाणित नकाशे सोबत असणे आवश्यक आहे.

४] प्रस्ताव सादर करतांना प्रस्तावामध्ये खालील कागदपत्रे आवश्यक आहे. तसेच सदरची कागदपत्रे कोणत्या पृष्ठांवर आहेत हे ही सुस्पष्टपणे सुरवातीच्या अनुक्रमणिकेमध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

अ] प्रस्तावीत ग्रामपंचायतीची लोकसंख्या दर्शविणारी कागदपत्रे.

ब] संभाव्य ग्रामपंचायतचे गांव महसूली गांव म्हणून जाहीर झाले आहे या बाबतची अधिसूचना/प्रमाणपत्र.

क] प्रस्तावीत ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे अर्ज/निवेदने शिफारशी.

ड] ग्रामपंचायतीचा ठराव व स्थायी समिती जिल्हा परिषद यांचा प्रमाणीत ठराव.

इ] प्रस्तावित ग्रामपंचायतीच्या हद्दी/सीमारेषा दर्शविणारे नकाशे सार्व्हे क्र. /गट क्र. असलेले नकाशे/यादी.

ई] सध्याच्या ग्राम पंचायतीच्या निवडणूकीची तारीख व मुदत संपणेची तारीख/प्रशासक असल्यास नेमणुकीची तारीख/कारणे.

फ] पाटबंधारे प्रकल्पामुळे प्रकल्प विस्थापितांसाठी निर्माण झालेली पुनर्वसित गांव असल्यास त्या बाबतची अधिसूचना.

च] गट ग्राम पंचायतीच्या मागील तीन वर्षांचे अंदाजपत्रक, मागील तीन वर्षांचे जमा खर्चाचे तक्तेक, प्रस्तावित ग्रामपंचायतीचे संभाव्य अंदाजपत्रक.

५] तसेच प्रस्तावासोबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे सविस्तर अभिप्रायासह टिप्पणी व विभागीय आयुक्त यांची स्पष्ट शिफारस असणे आवश्कय आहे. सदर अभिप्राय व शिफारस यामध्ये खालील मुद्दे आवश्यक आहे.

१] सदर ग्राम पंचायत विभाजन/एकत्रिकरण/त्रिशंकू भागाच्या ठिकाणी नवीन ग्राम पंचायत स्थापन करणेचा प्रस्ताव हा ग्रामस्थांच्या मागणीनुसार आहे कां ? या ठिकाणी ग्रामपंचायतस्थापन होणे कां आवश्यक आहे ?.

२] सदरचा प्रस्ताव शासनाच्या दि. ५-२-९० च्या परिपत्रकातील सर्व अटी/निकष पूर्ण करणारे आहे कां ?

३] संभाव्य ग्रामपंचायती आर्थिक दृष्टया सक्षम असेल काय ?

६] तसेच ग्रामस्थ ग्राम पंचायतीच्या मागणीनुसार ग्रामपंचायती स्थापन करण्याचे प्रस्ताव कोणत्याही स्तरावर प्रलंबित राहू नये याबाबतीत न्यायालयाने निर्देश दिले आहेत. यास्तव ग्रामपंचायत विभाजनाच्या/एकत्रिकरणाच्या त्रिशंकू क्षेत्रासाठी स्थापन करण्याच्या प्रस्तावावर त्वरीत कार्यवाही व्हावी.

८] प्रस्तावाची मांडणी ह्या सुबक व बांधणी दाट्ट असावी जेणेकरुन प्रस्तावातील कागदपत्रे सैल होऊन सुटी होणार नाही. प्रस्ताव फाईल कव्हरमध्ये पाठविणेत संयुक्तिक होईल.

शासनास प्रस्ताव पाठवितांना उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/- रा.का.पवार.
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति
१] सर्व विभागीय आयुक्त.
२] सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

---

नं. रजिप/साप्रवि/ग्रापं/कार्य-२/८८४/९८
जिल्हा परिषद कार्यालय, रत्नागिरी.
दिनांक २८/३/१९९८

प्रति:-
१] गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व

२/- सोबत ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे परिपत्र क्र. व्हीपीएम-११९८/प्र.क्र.६२३/२२ दि. ९-३-९८ आपणाकडे अग्रेषित करणेत येत आहे. तरी त्याचा परिपूर्ण अभ्यास करुन नमुन्यात ग्राम पंचायत विभाजन प्रस्ताव सादर करावेत.

प्रत माहितीसाठी सादर.

१] मा. अध्यक्ष, जि.प, रत्नागिरी.
२] मा. उपाध्यक्ष. जि.प. रत्नागिरी.
३] मा. सभापती विषय समिती [सर्व]
४] मा. सभापती पंचायत समिती [सर्व]

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, रत्नागिरी करिता.

शासन परिपत्रक क्र२६९७/प्र.क्र. ६२३/२२ दि. ९ मार्च १९९८ सोबतचे प्रपत्र.

शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम-११८९/के. ने. ३०१०/२२ दि. ५-२-९० नुसार ग्राम पंचायत विभाजन/एकत्रीकरण/स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासंबंधीचे निकष व अटींची पूर्तता करणारे विहित प्रपत्र.

प्रस्तावाचे नांव:-

| अ.नं. | बाब | शासन नियमानुसार आवश्यकता. | गांव संदर्भात स्थाती/तपशील/ अभिप्राय. | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | लोकसंख्या | अ] सर्वसाधारण लोकसंख्या किमान ६०० | प्रस्तावीत ग्रापं. ची नांवे व [समाविष्ट गांवे ] लोकसंख्या [प्रमाणपत्र<br>१.<br>२. | |
| | | ब] वाडी/तांडा ३०० किमान लोकसंख्या. | अभिप्राय | |
| २. | होणाऱ्या ग्रापं. चे दरडोई उत्पन्न. | सर्वसाधारण रु. १०/-<br>ब] डोंगराळ/ आदीवासी भागासाठी रु. ६/-<br>विभाजनानंतरचे संभाव्य बजेट | प्रस्तावीत ग्रापं. ची नांवे उत्पन्न खर्च दरडोई उत्पन्न<br>१.<br>२.<br>अभिप्राय - | |
| ३. | महसुली गांव | प्रस्तावीत ग्रा.पं. ही महसुली गांव असणे आवश्यक आहे. | महसुली गांव जाहीर झाल्याचे अधिसूचना प्रमाणपत्र<br>अभिप्राय - | |
| ४. | गांवाचे क्षेत्र | गांवाचे स.नं./गट न. निश्चीत असावेत. | प्रस्तावीत ग्रापं. ची नावे सार्व्हे नं./गट क्र. ची यादी व नकाशे.<br>अभिप्राय | |
| ५. | पुनर्वसित गांव. | विशेष बाब म्हणून अटी शिथील आहेत. | प्रमाणपत्र<br>अभिप्राय | |

...२

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ६. | मागणी कोणी केली त्यांचा दि. | ग्रा.पं. किंवा ग्रामस्थ यांनी केली पाहिजे. | संभाव्य ग्रा.पं.च्या ग्रामस्थांचे अर्ज/निवेदने/शिफारशी | अभिप्राय |
| ७. | प्रस्तावित स्वतंत्र ग्रामपंचायत होणेसाठी ग्रामपंचायतीने ठराव केला आहे का ? | ठराव केला असल्यास क्र. व दि. नमूद करावा. | ग्रामपंचायतीचा ठराव क्र. व दि. यांची मूळ प्रमाणित प्रत | अभिप्राय. |
| ८. | ग.वि.अ. यांचे अभिप्राय | पत्र क्र. व दि. नमूद करावे. | | अभिप्राय. |
| ९. | ग्रुप ग्रा.पं.ची निवडणूक होऊन २ वर्षांचा काळ लोटला आहे का? | निवडणूकीनंतर २ वर्षांचा काळ जावा लागतो. | निवडणूकीची तारीख, मुदत संपणेची तारीख प्रशासक असल्यास प्रशासक नेमण्याची कारणे व कधी पासून आहे ? | |
| १०. | ग्रुप ग्रा.पं.चे मागील २ वर्षांचे अंदाजपत्रके सोबत आहेत का ? | | | अभिप्राय. |
| ११. | मागील ३ वर्षांचे जमाखर्चाचे तक्ते जोडले आहे का? | | | अभिप्राय |
| १२. | नवीन होणाऱ्या ग्रामपंचायत अंदाजपत्रक सोबत सादर केले आहे काय ? | | | अभिप्राय. |
| १३. | महसूली गांवाची हद्द दर्शविणारे नकाशे सोबत आहेत का ? | | | अभिप्राय. |
| १४. | प्रस्तावित ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन केल्यास कोणत्या गट ग्राम पंचायत अस्तित्वात येतील ? | | सध्याच्या ग्रामपंचायतीचे नांव प्रस्तावीत ग्रामपंचायतीचे नांव तालुका जिल्हा [मराठी व इंग्रजी] | |
| १५. | इतर- नव्याने स्थापन होणाऱ्या पंचायतीस ग्रामस्थांनी कमीत कमी पुढील सुविधा उपलब्ध करुन देता आल्या पाहिजेत.<br>अ] पाणी पुरवठा<br>ब] रस्ते बांधणे/सुस्थितीत ठेवणे व त्यांची दुरुस्ती करणे.<br>[illegible] | | | अभिप्राय |

१६. त्रिशंकू गांव - राज्यातील काही गांवाचा अगर भागाचा समावेश नगरपरिषाद/किंवा ग्राम पंचायत हद्दीत नसतो. त्यामुळे तेथील जनतेला न.प./ग्रापं/निवडणूकामध्ये भाग घेत नाही. आणि स्थानिक नागरी सुविधा पासून वंचीत रहावे लागते अशी गांवे ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करणे बाबत शासन परिपत्रक दि. २१.१२.८८ अन्वये दिलेल्या सूचनानुसार कार्यवाही केली आहे काय ?

---

१७. ग्रामपंचायत ठेवणेसाठी स्थायी मिती, जिल्हा परिषादेचा ठराव.

ठराव क्रमांक व दिनांक नमूद करावा.
अभिप्राय:-

---

१८. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांचे अभिप्राय. पत्र क्र. व दिनांक.

---

१९. विभागीय आयुक्त यांची शिफारस

पत्र क्रमांक व दिनांक

---